फक्त सभासदांसाठी
वर्ष ४४वे, अंक ३रा ✲ सप्टेंबर २०२५

सभा : मंगळवारी संध्या. ६.३० वा.
रूईया मूक बधिर शाळेचे सभागृह,
स.प.महाविद्यालय प्रांगण (मागची बाजू)

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६

✲ अध्यक्ष ✲
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

✲ संपादक ✲
प्रा. रवींद्र कोठावदे
मो.९८६०४२४३४९

## या भवनातील........!

दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी स्नेहसेवा सदस्यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनला भेट दिली आणि सर्वांनी ह्या क्रांतिकारकांच्या वास्तूचे महात्म्य जाणून घेतले. हा मूळ वाडा १८६७ च्या दरम्यान बांधला गेला. वाड्यातील रथ गणेशोत्सवाइतकाच जुना असून, त्याच्या बिजागरी आणि काही आवश्यक साहित्य फ्रान्समधून मागविण्यात आल्या होत्या. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेशोत्सव हा पुण्यातील सर्वात पहिला गणेशोत्सव.

भाऊसाहेब रंगारी यांचा पुतळा, गणेशोत्सवाची माहिती देणारी छायाचित्रे, वृत्तपत्रातील कात्रणे, सर्वश्री काशिनाथ जाधव, वैद्य अण्णासाहेब पटवर्धन, कृष्णाजी खासगीवाले, गणपतराव घोटवडेकर, भाऊसाहेब रंगारी, मामासाहेब हसबनीस, परशुराम बाळाजी निकम, बळवंत नारायण सातव, दगडूशेठ हलवाई, बाळासाहेब नातू, लखूशेठ दंताळे, खंडोबा तरवडे यांची छायाचित्रे येथे पाहायला मिळतात. वाड्यातील जुन्या खोल्या, शस्त्रास्त्रे यात ठासणीच्या बंदुका, पिस्तुले, गोळ्या, बैठकीची गुप्त जागा, दरवाजा आतून बंद असला तरी बाहेर गुप्तपणे उघडण्याची सोय, तळघर आणि भुयाराची जागा, ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील पेटी, अशा सर्व गोष्टी पाहायला मिळाल्या.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनला भेट दिल्यानंतर सर्वांनीच तेथील गणपतीची आरती केली. गणपतीची मूर्ती राक्षसावर प्रहार करणारी आहे. ती प्रतीकात्मक संदेश देते. ही मूर्ती कागदाच्या लगद्यापासून केलेली असल्याने ती पर्यावरणपूरक आहे. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनचे अध्यक्ष, श्री. संजीव जावळे यांच्या सहकार्यातून ही भेट यशस्वी झाली. त्यांनी सर्व सदस्यांचा प्रासादिक उपरणं देऊन सन्मान केला.

प्रा. रवींद्र कोठावदे यांनी या भेटीचे आयोजन केले होते. त्यांनी आभार प्रदर्शन केले.

**प्रा. रवींद्र कोठावदे**

## दृक्-श्राव्य अलास्का सफर

दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी स्नेहसेवाच्या सभेत डॉ. सुप्रिया भिडे यांनी दृक-श्राव्य माध्यमातून अलास्का सफर घडवली. अमेरिकेतील या सर्वात मोठ्या राज्यातील भौगोलिक वैशिष्ट्ये, त्याचे हवामान, तेथील निसर्ग, तेथे पूर्वी असलेल्या जमाती, त्यांचे राहणीमान, रशियाकडून ते अमेरिकेकडे कसे वळले, याचा रंजक इतिहास त्यांनी छान पद्धतीने विशद केला. अलास्कातील नितांत सुंदर निसर्ग, छोटी छोटी बेटे, हिम नद्या, हिम भूमी, हिम पर्वत विविध फोटोंच्या माध्यमातून त्यांनी दाखवले. तेथील वृक्ष आणि प्राणी जीवन, याचाही परिचय त्यांनी करुन दिला. खास करुन सोलमन मासा, व्हेल मासा, याचे फोटोच्या माध्यमातून दर्शन घडवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सोन्याच्या खाणीची माहिती त्यांनी दिली. सोनं काढण्यासाठी किती कष्ट उपसावे लागतात आणि निसर्गाशी झुंज द्यावी लागते, याची कल्पना त्यांच्या कथनातून आली.

आज तेथील अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित आहे. पेपर मिल, समुद्री खाद्य आणि मौल्यवान खनिजांवर अर्थव्यवस्था अवलंबून आहे, हे कळले.

डॉ. सौ. प्रिया भिडे यांचे पेडियाट्रीक फिजिओथेरपीस्ट म्हणून कार्यकर्तृत्व सर्वश्रुत आहे. गच्चीवर कचरा व्यवस्थापन करुन त्यांनी सजीव मातीतून बाग फुलवलेली आहे. कचरा व्यवस्थापन याविषयी त्या विविध शहरात कार्यशाळा घेऊन लोकजागृतीचे काम करत आहेत. अनेक मासिके आणि वृत्तपत्रांमध्ये त्यांनी लेखन केलेले आहे. आकाशवाणीवर कार्यक्रमही सादर केलेले आहेत.

डॉ. प्रिया भिडे यांचा परिचय छायाताई काळे यांनी करुन दिला. आभार प्रदर्शन डॉ. सुधा जावडेकर यांनी केले.

**छायाताई काळे**

## पुस्तकांच्या अद्भुत दुनियेत....

मंगळवार, दि. २३ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या सभेत स्नेहसेवाचे ज्येष्ठ सदस्य ॲड. विद्याधर शिंत्रे यांनी, त्यांना आवडलेल्या विविध पुस्तकांचा परिचय करुन दिला. ह्या निमित्ताने त्यांचा वाचनाचा व्यासंग किती दांडगा आहे, वाचन चौफेर आहे, हे प्रत्ययास आले आणि श्रोते अचंबित झाले. त्याचबरोबर वाचन हे सवय म्हणून जोपसण्यासाठी हे कथन प्रेरणादायी होते. ॲड. शिंत्रे यांनी परिचय करुन दिलेली पुस्तके आणि त्यांची तोंडओळख–

१) रुळानुबंध– ले. गणेश कुलकर्णी– लोको पायलटची नोकरी करतांना इंजिनाच्या खडखडाटात सुद्धा संवेदनशील मन आणि रसिकता जागृत ठेवणाऱ्या माणसाचं मनोगत सांगणारे हे पुस्तक.

२) Walking on the Edge– ले. प्रसाद निकते– हे पुस्तक म्हणजे सह्याद्रीच्या घाटमाथ्याच्या धारेवरुन सलग ७५ दिवस अविश्रांत पायपीट करणाऱ्या एका अवलियाच्या अनुभवांची शिदोरी. सह्याद्रीच्या रौद्र स्वरुपाबरोबरच शहरी आणि खेड्यातल्या माणसांच्या भिन्न स्वभावांचं दर्शन करुन देणारं हे पुस्तक.

३) Thousand Cuts- ले. टी. जे. जोसेफ– मुलतत्ववाद्यांच्या धर्मांधतेने बळी घेतलेल्या केरळमधील एका प्रोफेसरची आत्मकहाणी. या पुस्तकाला केरळ साहित्य अकॅडेमीचा पुरस्कार मिळालेला आहे.

४) Gorakhpur Hospital Tragedy– ले. डॉ. काफील खान– एक कर्तव्यनिष्ठ डॉक्टर आणि उन्मत्त सत्ता यातील झुंजीची ही कहाणी.

५) **निळे आकाश, हिरवी धरती** – ले. मिलिंद बोकील– मंगोलियासारख्या अत्यंत अपरिचित अशा प्रदेशाचा अवघड भूगोल पण अद्भुत इतिहास वर्णन करणारं हे पुस्तक.

६) **क्षितिजापारच्या संस्कृती**– ले. मिलिंद बोकील– विविध देशांमधील काही जिवंत तर काही लोप पावत चाललेल्या संस्कृतींचे यथार्थ चित्रण.

७) **भारतीय मानवशास्त्राच्या प्रांगणातील आद्य दीपमाळ**– ले. प्रतिभा कवेकर– पुरोगामी विचारवंत लेखिका डॉ. इरावती कर्वे यांची पहिल्या स्त्री मानवशास्त्रज्ञ ही प्रतिमा अधोरेखित करणारे पुस्तक.

८) **कथा अकलेच्या कायद्याची**– ले. मृदुला बेळे– बौद्धिक संपदा आणि हक्क, पेटंट्स, कॉपी राईट, अशा गुंतागुंतीच्या गोष्टींची उकल करुन देणारे पुस्तक.

९) **अशीही एक झुंज**– ले. मृदुला बेळे– १९८० च्या सुमारास पसरलेल्या एड्सच्या निवारणासाठी मानवतेच्या हितासाठी सिप्लासारख्या औषध निर्मिती करणाऱ्या कंपनीने आंतरराष्ट्रीय पेटंट कायद्याबरोबर दिलेली झुंज कथन करणारे पुस्तक.

१०) Wonderland of Words– ले. डॉ. शशी थरुर– इंग्रजी भाषेचे सौंदर्य विषद करणारे पुस्तक.

११) Absolute Power- ले. सुचेता दलाल– शोधपत्रकारितेत अव्वल नाव असणाऱ्या लेखिकेने केलेला हा नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या व्यवहारांचा लेखाजोखा. सामान्य गुंतवणूकदाराला स्तिमित करणारी ही पत्रकारिता.

ॲड. विद्याधर शिंत्रे यांचा परिचय ॲड. डॉ. निलिमा भडभडे यांनी करुन दिला. आभार प्रदर्शन डॉ. सुधा जावडेकर यांनी केले.

**सौ. प्रज्ञा यार्दी**

## त्रैमासिक सभा

मंगळवार ३० सप्टेंबर २०२५ रोजी स्नेहसेवा / मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीची दुसरी त्रैमासिक सभा आयोजित केली होती.

सभेच्या कामकाजात मागील ठराव सर्वानुमते मान्य झाले. खजिनदार श्री अंबुलकर यांनी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीचा जमाखर्च सादर केला. सचीवांनी दुसऱ्या तिमाहीतील कामाचा आढावा सादर केला. मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीतर्फे सुमारे दहा युवतींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरविरोधी लसीचा दुसरा डोस देण्यात आला. या तिमाहीत पावसाचा प्रभाव अधिक असल्याने वाड्या वस्त्यांवर कोणताही उपक्रम हाती घेणे शक्य झाले नाही.

स्नेह सेवाच्या साप्ताहिक सभांमधून निरनिराळ्या वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली गेली. या खेरीज संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सभासदांनी विविध गुण दर्शनाचे उत्तम कार्यक्रम सादर केले. सभासदांच्या विविध छंदांवर आधारित कार्यक्रम सर्वांच्या पसंतीस उतरला.

सैनिक स्नेह या उपक्रमान्तर्गत सीमेवर तैनात सैनिकांना दिवाळीसाठी मिठाई पाठवली जाते. सैनिकांमधे हा उपक्रम लोकप्रिय झाल्याने या वर्षी फराळाचे एकूण ७५०० डबे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपक्रमाचे प्रमुख डॉ. दिनेश पांडे यांनी दिली.

महिन्याचा शेवटचा मंगळवार असल्याने प्रथेनुसार या महिन्यात वाढदिवस साजरे करणाऱ्या सभासदांचे अभिनंदन तर या महिन्यात उत्तम कार्यक्रम सादर केल्याबद्दल सप्टेंबर गटातील सभासदांचे कौतुक केले गेले.

अखेरीस नवरात्रीनिमित्त सभासदांसाठी अध्यक्ष डॉ. राधा संगमनेरकर यांनी दांडियाचे आयोजन केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सभासदांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. श्री बागुल यांनी साथीसाठी माऊथ ऑर्गनवर गाणी वाजवून कार्यक्रमाची रंगत वाढविली.

**नीला सरपोतदार**